Vivekanand Shikshan Sanstha’s

**Vivekanand Arts, Sardar Dalipsingh Commerce & Science College**

Samarthnagar, Aurangabad.

Date :

# PRESS RELEASE

## स्व क्षमतांची ओळख आणि विस्तार हाच गांधीवादः तुषार गांधी

विवेकानंद महाविद्यालय आणि महाराष्ट्र गांधी स्मारक निधी औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी जयंती निमित्त "गांधीविचार आणि प्रभाव: 150 वर्षे" या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी महात्मा गांधीचे पणतू तसेच महात्मा गांधी फाउंडेशन मुंबईचे व्यवस्थापकीय संचालक श्री. तुषार गांधी प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते तर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. श्याम शिरसाठ अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

आपल्या वक्तव्यात तुषार गांधी म्हणाले की गांधीचे विचार आजच्या काळात आरशाचे काम करतो ज्यात तुम्हाला तुमच्याच आत्म्याचे दर्शन होते. जी व्यक्ती सत्य ओळखू व स्वीकारू शकते तीच आत्म्याचा आवाज ऐकण्याचे धैर्य दाखवते. गांधीवाद स्वतंत्र विचार करायला शिकवतो मात्र आजच्या शिक्षणात एक प्रकारची यांत्रिकता व बंदिस्तपणा आहे ज्यामुळे विवेकशक्ती नष्ट होत आहे. आजच्या शिक्षणात व्यक्ती गुलाम होत असल्याने प्रश्न विचारण्याची मुभा देणारे आणि सत्य तसेच स्वातंत्र्याचा आग्रह करणारे शिक्षण मिळणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना गांधी म्हणाले की मजबूरी का नाम महात्मा गांधी असे सर्रासपणे म्हटले जाते परंतु गांधी मजबूरी नसून मजबूती आहे. गांधी हा व्यक्तीला स्वतःच्या क्षमता ओळखायला व त्यांचा विस्तार करायला शिकवतो. गांधीचा द्वेष किंवा भक्ती करण्यापेक्षा विवेकवादी होणे आणि त्यांचे विचार आत्मसात करणे आजच्या काळात आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र गांधी स्मारक निधी औरंगाबादचे सचिव अन्वर राजन, विवेकानंद शिक्षण संस्थेचे सचिव माननीय श्री. श्रीमंतरावजी शिसोदे, सहसचिव यशोद पाटील, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी श्री. प्रभाकर मोरे, उपप्राचार्य डॉ. डी. आर. शेंगुळे, डॉ. राजेंद्र शेजुळ व शिक्षक तसेच विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रीमती शर्मिष्ठा ठाकूर यांनी केले.




विवेकानंद महाविद्यालय आणि
महाराष्ट्र गांधी स्मारक निधी केंद्र, औरंगाबाद
गांधी विचार आणि प्रभाव : 150 वर्षे
वक्ते : मा. श्री. तुषार गांधी
प्रमुख उपस्थिती
मा. श्री. श्रीमंतराव शिसोदे
मा. श्री. अन्वर राजन
मा. श्री.यशोद पाटील
मा. प्रोफेसर श्याम शिरसाठ
Vivekanand College, Aurangabad (M.S.).India
PROF SHYAM SHIRSATH
HON SHRI ANWAR RAJAN


HON.SHRI.TUSHAR GANDHI
HON.SHRI.ANWAR RAJAN
PROF.SHYAM SHIRSATH